# ई - पोलीस पत्रिका

दि ०२/०३/२०२०　　　　　　　　　　　　　　　　　　　　　अनु.क्र.४६

## (अमरावती शहर पोलीसांची २०२० ची उद्दिष्टे)

- जागरूक व तत्पर पोलीस.
- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा

## शिक्षा/विभागिय चौकशी/

**१.क्र.पोआअ/ विचौ-२/ कसुरी / गैरहजर/आदेश/ सपोनि श्री वाकोडे + ३ /९८८/२०२० अमरावती दि. ०५/०२/२०२०**

### आदेश

तुम्ही सपोनि श्री वाकोडे, पो.स्टे.गाडगे नगर पोशि/१३५६ आदमाने , पोलीस मुख्यालय व पोशि/३९३ विनोद माहुरे ,पो.स्टे फ्रेजरपुरा येथे नेमणुकीस असुन, तुमची दि.२३.१२.२०२० रोजी वेगवेगळया ठिकाणी नाकाबंदी डयुटी लावण्यात आली असता सदर डयुटी दरम्यान तुम्हास सपोआ श्री.डोंगरे यांनी चेक केले असता तुम्ही वरिष्ठांना कुठलीही पुर्वसुचना न देता कर्तव्यावर गैरहजर मिळुन आले . तसेच मपोशि/१६२३ उज्वला इंगळे ,शवाशा पुर्व यांनी नाकाबंदीबाबत चुकीची माहीती देवुन वरीष्ठांची दिशाभुल केलेली आहे.सदरची बाब अतिशय गंभीर आहे.

तुम्ही शिस्तबध्द पोलीस खात्यात नेमणुकीस असतांना सुध्दा वरीष्ठांना सुचना न देता उपरोक्त प्रमाणे गैरहजर राहुन बेशिस्तपणाची गैरवर्तणुक केली असल्याने तुम्हास मुंबई पोलीस ( शिक्षा व अपील ) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **सक्त ताकीद** हि शिक्षा देण्यात येत आहे

०००

**२.क्र.पोआअ/ विचौ-२/ कसुरी/ गैरहजर/रजा/आदेश/पोशि-३१७ आतराम/९५५/२०२० अमरावती दि. ०५/०२/२०२०**

### आदेश

तुम्ही पोशि/३१७ अविनाश आतराम, पोलीस मुख्यालय येथे नेमणुकीस असुन,तुम्ही दि.३१.११.२०१९ ते दि.१३.०१.२०२० पावेतो एकुण १४ दिवस वरिष्ठांना कुठलीही पुर्वसुचना न देता कर्तव्यावर अत्यंत निष्काळजीपणे, बेजबाबदारपणे गैरहजर राहुन गैरशिस्तीचे वर्तन केले आहे. सदरची बाब अतिशय गंभीर आहे.परंतु तुम्हास कावीळ आजार झाल्याने व त्याचे आयुर्वेदीक उपचार घेतल्याने गैरहजर राहील्याचे कारण वापसी रिपोर्टमध्ये नमुद केल्याने व सदरचें कारण सत्य असल्याचे समजुन तुमचा उपरोक्त गैरहजर कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रं.६१ चे तरतुदीनुसार **दि. ३१.११.२०१९ ते दि.१३.०१.२०२० पावेतो एकुण १४ दिवस परीवर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.**

०००

**३.क्र.पोआअ/विचौ-२/गैरहजर-हजर /आदेश/पोना-११८७ लोखंडे/९३९/२०२० अमरावती दिनांक .०५.०२.२०२०**

### आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कालावधीमध्ये कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर राहील्याने त्यांनी कर्तव्यावर हजर करुन घेण्यासाठी दिनांक ०४.०२.२०२० रोजी विनंती अर्ज सादर केल्याने मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे समक्ष आज्ञांकीत कक्षेत त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आल्याने नमुद पो.कर्मचारी यांना त्यांच्या कर्तव्यावर हजर करुन घेण्यात यावे.तसेच त्यांचा रजा कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे निश्चीत करण्यात आला आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व हुददा/ब.न. | नेमणुक | गैरहजर कालावधी | मंजुर रजा |
|---|---|---|---|---|
| १ | पोना/११८७ अजय मनोहरराव लोखंडे | पो.स्टे. नांदगाव पेठ | दि.१९.१२.२०१९ ते दि.०४.०२.२०२० **एकुण ४८ दिवस** | **म.ना.से.(रजा) नियम १९८१ मधील ५० चे तरतुदीनुसार ४८ दिवस अर्जित रजा.** |

**०००**

**४.क्र.पोआअ/विचौ-२/कसुरी/गुन्हे प्रलंबित/अंतिम आदेश/पोउपनि/कदम/१०४२/२०२० अमरावती दि.०७.०२.२०२०**

## आदेश

**वाचा :-** या कार्यालयाचे कादानो क्र. पोउआ/परि-१/कादानो/२३/२०२० अमरावती दि.१३.०१.२०२०

**कसुरदाराचे नाव :-** पोउपनि राम कदम, पो.स्टे.नांदगाव पेठ अमरावती शहर

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही वर तुमच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नेमणुकीस असुन , आम्ही तुमचेकडे तपासावर प्रलंबित असलेल्या गुन्हयाचा आढावा घेतला असता खालीलप्रमाणे गुन्हयाचा काहीच तपास केलेला नसुन विनाकारण तपासावर गुन्हे प्रलंबित ठेवल्याचे दिसुन आले.

| अ.क्र. | अप.क्र. | कलम |
|---|---|---|
| १ | १०४/१९ | ३७६,४१७,३२३,५०४,५०६,५०७ भादवि |
| २ | १९५/१९ | ३५४ भादवि ८,१२ पोक्सो |
| ३ | २१९/१९ | ३५४,४५२ भादवि |
| ४ | २२२/१९ | ३७६,४३२ भादवि ४,६,पोक्सो |
| ५ | २३५/१९ | ३५४,४५२ भादवि ८,१२ पोक्सो |
| ६ | २७७/१९ | ३५४,४५२ भादवि ८,१२ पोक्सो |
| ७ | २६१/१९ | ६५ ई |
| ८ | २८१/१९ | २९५ अ भादवि |
| ९ | २८३/१९ | ६५ ई |
| १० | २८७/१९ | २७९, ३०४ अ भादवि |

वरील गुन्हे दाखल होवुन बराच कालावधी झालेला असुन , सन २०१९ मध्ये गुन्हे तुमचेकडे प्रलंबित आहेत .सदर गुन्हेचा निपटारा करण्याकरीता वरीष्ठांनी वेळोवेळी तोंडी /लेखी सुचना देवुन सुध्दा तुम्ही सदर सुचनाकडे दुर्लक्ष करुन गुन्हे निकाली काढण्याबाबत अतिशय हलगर्जीपणा, निष्काळजीपना व बेशिस्तपणाचे वर्तन करुण सदरचे गुन्हे विनाकारण तपासावर गुन्हे प्रलंबित ठेवले आहे.

अशाप्रकारे तुम्ही उपरोक्तपणाने गुन्हे प्रलंबित ठेवुन गैरवर्तन केले असल्याने , तुमच्या या बेशिस्तपणाच्या व बेजबाबदापणाच्या कसुरीबदल तुम्हास पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (२) वर्षाकरीता स्थगिती (परिणामाशिवाय)का करण्यात येवु नये. याबाबत संदर्भीत आदेशान्वये करणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदरची नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुम्ही अद्यापपावेतो स्पष्टीकरण सादर केलेले

नाही तरी तुमचे भविष्याचा विचार करता प्रस्तावित शिक्षेमध्ये शिथीलता आणुन आम्ही खालील प्रमाणे अंतिम शिक्षेचे आदेश पारीत करीत आहोत.

**अंतिम आदेश**

उपरोक्त कसुरी प्रकरणी वर नमुद कसुरदार यांना महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ नियम क्रमांक ३ मधील (२) चे (v) तरतुदीनुसार **पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणामाशिवाय) स्थगिती करण्याची शिक्षा** करण्यात येत आहे.

तुम्ही जर सदर शिक्षेमुळे व्यथित होत असाल तर सदरचा आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन ६० दिवसाचे आत योग्य त्या मार्फतीने मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य ,मुंबई यांना अपील सादर करु शकता.

ooo

## स्थावर मालमत्ता परवानगी .

**५.क्र.पोआअ/आस्था-८/स्थावर मालमत्ता परवानगी/१०२८/२०२० अमरावती दि.०७.०२.२०२०**

**संदर्भ** -पोशि/३५४ राजकुमार हरिराम प्रजापती ,नेमणूक पोलीस मुख्यालय ,अमरावती शहर यांचा दि.२१.११.२०१९ चा अर्ज

## आदेश

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर आस्थापनेवरील पोशि/३५४ राजकुमार हरिराम प्रजापती ,नेमणूक पोलीस मुख्यालय अमरावती शहर यांनी स्वतःच्या नावाने प्लॉट ही स्थावर मालमत्ता खरेदीव्दारे संपादीत करण्यांची परवानगी मिळणेबाबत, त्यांचा अर्ज सादर केला असुन स्थावर मालमत्तेचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | स्थावर मालमत्ता धारकांचे नाव व पत्ता | पांडुरंग अण्णाजी भालेराव , वय ६४ वर्षे व्यवसाय सेवानिवृत्त रा.एफ १६,२ रा.मजला रुम नं ३ ,ब्रिज व्यूव, सेक्टर १०, डी ए बी शाळेजवळ, नवी मुंबई ऐरोली, जि. ठाणे |
| २ | स्थावर मालमत्तेचे वर्णन | मौजे - कठोरा बु. प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे न.९४/१- ब व ९४/१ क ९४/२ मधील २ हे ९२ आर जमीणीतील वि.तहसिलदार साहेब अमरावती यांनी त्यांचे फाईलवरील रे.के.नं.एन.ए.पी.३४/कठोरा बु.२५/१९९९-२००० नुसार लेआऊट कव्हर्शन मंजुर झालेला खुला प्लॉट क्र.१०-बी (दहा बी) याची साईज पुर्व बाजु नकाशाप्रमाणे ७.५. मी x १९ मी असुन याचे एकुण क्षेत्रफळ १५३३ चौ.फुट (१४२ चौ.मी.) आहे. |
| ३ | स्थावर मालमत्ता खरेदी व्दारे संपादित करण्यासाठी ठरविलेली किमंत | **रुपये ४,४४,५७०/-** |
| ४ | स्थावर मालमत्ता खरेदीव्दारे संपादीत | **रुपये. ४,००,०००/- एस बी आय बँककडुन लोन** |

| | | |
|---|---|---|
| | करण्यांस जमविलेल्या रक्कमेचा तपशिल | **रुपये ४४,५७०/- स्वतःच्या बचतीमधुन** |
| ५ | शासकीय कर्मचाऱ्याने सदरची स्थावर मालमत्ता पुर्व परवानगी घेण्यापुर्वी खरेदी केली काय, कींवा पुर्व परवानगी घेवुन खरेदी करणार आहे, पुर्वीच खरेदी केली असल्यास खरेदीचा दिनांक | पुर्व परवानगी घेवुन खरेदी करणार आहे. |

वरील नमुद कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ नियम क्रमांक १९ (२)(३) च्या तरतुदीनुसार पूतर्ता करत असल्याने त्यांना स्वःच्या नावाने उपरोक्त स्थावर मालमत्ता खरेदीव्दारे संपादीत करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

०००

## वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा

सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नांव पोलीस स्टेशनचे नोटीस बोर्डवर लिहुन हार्दीक शुभेच्छा द्याव्यात.

| **अ.क्र.** | **हुददा** | **□.□□** | **□□□. व कर्म. यांचे नांव** | **नेमणुक □□.स्टे.** | **दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | सपोउपनि | ५०६ | जाहीर कादीर | मोपवि | ०२/०३/२०२० |
| **०२** | पोना | ८८८ | अब्दुल कादीर | पो.स्टे.कोतवाली | ०२/०३/२०२० |
| **०३** | पोना | १२८१ | गणेश राऊत | पोलीस मुख्यालय | ०२/०३/२०२० |
| **०४** | पोशि | १८०९ | योगेश गव्हाळे | मोपवि | ०२/०३/२०२० |

**(लक्ष्मण भोगण)**
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन)
पोलीस आयुक्त,अमरावती शहर करिता

प्रत,

पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक , आस्थापना शाखा/सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता